महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-एसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११/८८/१२,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २२ सप्टेंबर, १९९४

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-ईएसबी-११८९/१०-८९/१२,
दिनांक ३१ जानेवारी, १९९०.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११
(८८)/१२, दिनांक २१ फेब्रुवारी, १९९४.

## शासन निर्णय

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक. एसआरव्ही/१०८८/प्र.क्र.११/८८/१२, दिनांक, २१ फेब्रुवारी, १९९४ अन्वये शासकीय सेवकांना वरच्या पदावर पदोन्नती देण्यासाठी निकटतम पदावरील त्यांच्या ५ वर्षांच्या गोपनीय अभिलेख्यांची सरासरी प्रतवारी निश्चित करण्यात आली आहे. त्या निर्णयामधील अनुक्रमांक २ मधील निकष संबंधीची तरतूद सध्या अंमलात असलेल्या कार्यपध्दतीशी सुसंगत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे वरील आदेशात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. गट "अ" मधील पहिल्या टप्प्यावरच्या सर्व पदोन्नत्या निव्वळ गुणवत्ता (Strict Selection) नुसार देण्यात याव्यात . मात्र त्यासाठी गोपनीय अहवालाचे निकष खालीलप्रमाणे असतील:-

(अ) ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.५०९९/- पर्यंत आहे, त्यासाठी किमान निकष म्हणून ५ वर्षांच्या गोपनीय अभिलेख्यांची सरासरी प्रतवारी "ब+" अशी राहील.

(ब) ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रु.५,१०० किंवा त्यापेक्षा अधिक आहे, त्यासाठी किमान निकष म्हणून ५ वर्षांच्या गोपनीय अभिलेख्यांची सरासरी "अ" अशी राहील.

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.२१ फेब्रुवारी, १९९४ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशांच्या निकषासंबंधीचे आदेश लक्षात घेऊन त्यानुसार मध्यंतरीच्या काळात काही निवडसूचीचे प्रस्ताव अंतिम केले असल्यास त्यांचे पुनर्विलोकन करण्यात यावे.

३. एखाद्या संवर्गासंबंधात वर नमूद केलेल्या परिच्छेद १मधील (अ) व (ब) मधील निकषापेक्षा त्या-त्या संवर्गातील कामाचा व्याप व जबाबदाऱ्या लक्षात घेऊन वेगळा निकष निश्चित केला गेला असल्यास त्यांना हे आदेश लागू न होता त्या संवर्गासाठी निश्चित करण्यात आलेले प्रतवारी संबंधीचे आदेश लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( द. मा. जोशी )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.